<u>नियमित दिवाणी दावा क.१९/२०१७ मधील नि.क.६५ वरील आदेश</u>
***(CNR NO-MHRG14-001316-2016)***

*<u>सचिन सुभाष म्हात्रे</u> ... वादी*
*वि.*
*<u>श्रीधर द्वारकानाथ म्हात्रे, वगैरे</u> ... प्रतिवादी*

**१.** प्रतिवादी क. १/१ तर्फे प्रस्तुत अर्ज हा विना कैफियत आदेश रदद करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जावर वादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले.

**२.** प्रतिवादी क. १/१ तर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदरील प्रतिवादी हा कामानिमित्त सऊदी अरेबिया येथे राहत असल्यामुळे त्याचेवर समन्सची बजावणी झालेली नाही. परंतु नजर चुकीने तयाचे विरुध्द विना कैफियत आदेश पारीत करणेत आला आहे. सदर प्रतिवादी हा सऊदी अरेबिया येथून परत आल्यानंतर दि.०२/०८/२०१९ रोजी उरण न्यायालयात वारस दाखल्याचे कामी हजर झाल्यानंतर त्यास सदर दाव्याची माहिती मिळाली त्यामुळे तो वेळेत कैफियत दाखल करु शकला नाही. त्याची कैफियत रेकॉर्डवर येणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे विना कैफियत आदेश रदद करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी. वादीतर्फे वकीलांनी सदर अर्जास जोरदार हरकत घेवून त्यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा ठरावाकरीता व इतर तद्नुशंगिक मागण्यांकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क. १/१ हा सदर प्रकरणात त्याची कैफियत दाखल करून दाव्यास विरोध करणार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जातील कारणे विचारात घेता त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी मिळावी, प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता यावे व प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता प्रतिवादी क. १/१ यास कायद्यानुसार समान संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. करीता, वरील बाबींचा परिस्थितीचा व अर्जातील कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आला आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क. १/१ याचा अर्ज (नि.क.६५) मंजूर करणेत येत आहे. |

उरण. ( प्रि.म.पाटील )
दिनांक : २६/०९/२०१९ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.